नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २६८ Issue - 268 | वार मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ Blow- Tuesday Date 17 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# केमिकल कारखान्यातील भीषण स्फोटात ८ कामगार जिवंत जळाले

## गेटला कुलूप लावून अवैध फटाक्यांची निर्मिती; बचाव पथकाने अवयवांचे तुकडे गोळा करून प्लास्टिक पिशवीत भरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयपूर : राजस्थानमधील भिवाडी येथील एका केमिकल कारखान्यात शक्तिशाली स्फोटात आठ कामगार जिवंत जळाले, तर चार जण गंभीर भाजले. त्यांना दिल्लीतील एम्समध्ये रेफर करण्यात आले आहे. कारखान्यात बेकायदेशीर फटाके बनवले जात होते. घटनास्थळावरून गनपावडर, फटाके आणि पॅकिंग कंटेनर जप्त करण्यात आले आहेत. आज सकाळी साडे नऊ वाजता खुशखेडा करौली औद्योगिक क्षेत्रात हा अपघात झाला. घटनेच्या वेळी सुमारे २५ कामगार काम करत होते. मृतदेह गंभीरपणे जळाले होते, फक्त अनेकांचे सांगाडे शिल्लक होते. शरीराच्या अवयवांचे तुकडे विखुरलेले आढळले. बचाव पथकाने हे तुकडे पॉलिथिन पिशव्यांमध्ये गोळा केले. जिल्हाधिकारी आर्तिका शुक्ला म्हणाल्या, हे लहान स्फोटक पदार्थ असल्याचे दिसते. गॅस गळती झाली नव्हती. एडीएम सुमिता मिश्रा यांच्या मते, कारखान्याच्या मालकाचे नाव राजेंद्र आहे. त्यांनी कारखाना तिवारीला भाड्याने दिला होता. दोघांशीही संपर्क झालेला नाही. अतिरिक्त एसपी म्हणाले, लहान स्फोटके आणि फटाके सापडले.

युनिटकडे रेडीमेड कपड्यांचा परवाना

भिवाडीचे अतिरिक्त एसपी अतुल साहू म्हणाले की, आम्हाला एका केमिकल युनिटमध्ये आग लागल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तात्काळ पोहोचले. आग विझवण्यासाठी खूप प्रयत्न करण्यात आले, परंतु आगीची तीव्रता पाहता आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तिथे काम करणारे चार ते पाच लोक जखमी झाले आहेत आणि त्यांना दिल्लीतील एम्स येथे रेफर करण्यात आले आहे. बचाव कार्य पूर्ण झाले आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की युनिटकडे रेडीमेड कपड्यांचा परवाना होता आणि





आत लहान स्फोटके आणि फटाके सापडले आहेत. एफएसएल टीमला घटनास्थळी बोलावण्यात आले आहे. सखोल चौकशीनंतर कारण कळेल.

बेकायदेशीरपणे फटाके बनवले जात होते


मंत्री संजय शर्मा म्हणाले, हा एक गारमेंट झोन आहे; येथे इतर कोणताही व्यवसाय करण्यास परवानगी नाही. तथापि, बंद गेटच्या मागे बेकायदेशीर फटाके बनवले जात होते. मृतांची डीएनएद्वारे ओळख पटवली जात आहे. बहुतेक कामगार बिहारचे असल्याचे सांगितले जात आहे. खैरथल-तिजारा जिल्हा जिल्हाधिकारी बिहारमधील मोतिहारी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी सतत संपर्कात आहेत. राज्य सरकारने एक समिती स्थापन केली आहे. जिल्हा प्रशासनाला, विशेषतः ठखखउज ला निर्देश देण्यात आले आहेत. भिवाडी आणि खुशखेडा औद्योगिक क्षेत्रांमध्ये संपूर्ण तपासणी केली जाईल. कारखान्याच्या नोंदणीकृत उद्देशाव्यतिरिक्त कोणतेही काम आढळल्यास कारवाई केली जाईल.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले, कारखान्याचे गेट बंद होते

जवळच्या कारखान्याचे कर्मचारी सुरेश कुमार म्हणाले, अचानक, स्फोटानंतर आग लागली. पोलिस आणि अग्निशमन दलाचे जवान आल्यानंतर आम्हाला बाहेर काढण्यात आले. कारखाना सुमारे दीड ते दोन महिन्यांपासून सुरू होता. तेथे फटाके बनवले जात होते, परंतु कोणालाही आत जाऊ दिले जात नव्हते. गेट नेहमीच बंद असे.

# सोलापुरात अज्ञात वाहनाच्या धडकेत तीन युवक जागीच ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (प्रतिनिधी) : एकमेकाचे जिवाभावाचे मित्र सोमवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात रूपाभवानी मंदिराजवळील सिद्धेश्वर वुमेन कॉलेज समोरील रस्त्यावर भीषण अपघातात ठार झाले. एम .एच.१३ इ. आर. ०६२७ या दुचाकीवरून शहरात येणाऱ्या या तिघांना पाठीमागून आलेल्या वाहनाने धडक देऊन येथून पोबारा केला. दुचाकी एकीकडे आणि हे तिघे एकीकडे रस्त्यावर पडलेले भीषण चित्र तेथील नागरिकांनी पाहून पोलिसांना कळवले. जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ त्या ठिकाणी पोचले.

नागेश प्रकाश गवंडी (वय २७, रा. रविवार पेठ), रोहन अशोक कोरे (वय २३, रा. श्रीशैल नगर भवानी पेठ), प्रजल सुनिल चनशेट्टी (वय २५ रा. शेळगी) असं या तिघांची नावे आहेत. जोडभावी पोलीसांनी या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेऊन मदत कार्य हाती घेतले. नागेश गवंडी यांच्या मोबाईल वरून पोलिसांनी त्यांच्या नातेवाईकांशी संबंध संपर्क साधला तिघांना सिव्हील हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी सांगितलं

अज्ञात वाहनानं वेगात पाठीमागून जोरदार धडक दिली यात या तिघांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पुढे आले आहे पोलीस प्रशासन सीसीटीव्हीचा पाहणी करत आहेत.

या अपघातात ठार झालेला नागेश प्रकाश गवंडी हा फलटण येथे टोल नाक्यावर काम करत होता त्याच्या वडिलांचे चार महिन्यापूर्वीच निधन झाले आहे. यापूर्वी तो मार्केट यार्डात काम करत होता गेल्या चार महिन्यापूर्वी तो फोन आल्यावर कामाला गेला होता भाऊ बहीण आईसह तो राहत होता

**रुपाभवानी चौक येथे पहाटे घडली दुर्घटना**

तर दुसरा रोहन कोरे हा आई-वडील आणि मोठ्या भावासमवेत घरात होता. बजाज फायनान्स पुणे येथे काम करत होता त्याला एक विवाहित बहीण आहे तर तिसरा ठार झालेला युवक प्रज्वल चनशेट्टी हा बचत गटाची कामे करत होता. १९ तारखेला शिवजयंती असल्यामुळे तिघेही सोलापुरात आले असल्याची त्याच्या काही मित्रांनी सांगितले. तिघेही नागेश गवंडी यांच्या एम .एच. १३ इ.आर. ०६२७ या बर्गमन स्कुटरवरून घराकडे निघाले असताना पाठीमागून आलेल्या भरधाव अज्ञात वाहनाची त्यांना जोरदार धडक दिली. हे तिघे जागेवरच कोसळले तर स्कूटर लांब जावून पडली. घटनेनंतर अज्ञात वाहन न थांबता निघून गेले. अपघातावेळी मोठा आवाज झाला असे तेथील नागरिकांनी सांगतले. या घटनेत मरण पावलेले ठीके तरुण तिघा तरुणांची घरची परिस्थिती अत्यंत बेताची आहे तिघेही वेगवेगळ्या ठिकाणी काम करतात तिघेही घरातील करते तरुण होते. तिघेही अविवाहित होते. या घटनेने या तिघांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये तसेच जोडभावी पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यू अशी नोंद झाली आहे. ही घटना त्यांच्या तिघा मित्रांच्या नातेवाईकांना मित्रमंडळींना समजल्यानंतर सकाळीच शासकीय रुग्णालयात एकच गर्दी केली होती गवंडी कोरे, चंद्रशेट्टी परिवारातील महिला धायमोकळून रडत होत्या. मित्रमंडळ ओक्शाबक्षी रडत होते.

या घटनेत जबाबदार असलेल्या वाहनचालकावर गुन्हा दाखल केल्याशिवाय आम्ही प्रेत ताब्यात घेणार नाही असा पवित्रा सकाळपासून तिघा मयताच्या नातेवाईकांनी घेतला होता. या अपघाता प्रकरणी नातेवाईकांनी संशय व्यक्त केला. दुपारी पोलिसांनी या प्रकरणात जो दोषी असेल त्याच्यावर निश्चित गुन्हा दाखल होईल .पोलीस सर्वतोपरी शोध घेत असल्याचे सांगितल्याने नातेवाईकांनी दुपारच्या सुमारास प्रेत ताब्यात घेतले.

# ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईत अल्पसंख्यांक दर्जा; मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: उपमुख्यमंत्री अजित पवार ंच्या अपघाती निधनानंतर राज्यावर शोककळा पसरली. सरकारकडून शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला. त्याचवेळी अजित पवार यांच्याकडे असलेल्या अल्पसंख्याक विभागात धक्कादायक प्रकार घडला. अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशीच मंत्रालयात अल्पसंख्याक विभागात सह्यांचा सपाटा सुरु होता. या विभागाकडून ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईत अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला. या निर्णयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे.

अजित पवार ह्यात असताना त्यांनी ज्या फाईल्स पेंडिंग ठेवल्या होत्या, त्या फाईल्सवर त्यांच्या निधनानंतर, त्याच दिवशी घाईघाईत स्वाक्षरी करण्यात आल्या. ऑगस्ट २०२५ पासून या शाळांना अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. पण अजित पवार यांचं अपघाती निधन होताच अल्पसंख्यांक विभागातील अधिकाऱ्यांनी स्थगिती डालवून अल्पसंख्यांक प्रमाणपत्रांचं वाटप केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला. २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास अजित पवारांचं निधन झालं. त्यानंतर दुपारी तीनच्या सुमारास अल्पसंख्यांक विभागाकडून शाळांना प्रमाणपत्रांचं वाटप करण्यात आलं.



सर्व नियम पायदळी तुडवून, संवेदनशीलता गुंडाळून ७५ शाळांना प्रमाणपत्रांचं वाटप करण्यात आल्याचं प्रकरण गाजलं. त्यानंतर या प्रकरणाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाला स्थगिती दिली आहे. उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. दोषींच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर गुपचूपपणे प्रमाणपत्रांची खिरापत वाटणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते, याकडे लक्ष लागलं आहे.

शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याच्या प्रकरणात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी केला आहे. या प्रकरणात त्यांनी कारवाईची मागणी केली आहे. राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनीदेखील आक्रमक भूमिका घेतली. सदर शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याचा हा प्रकार धक्कादायक असून संबंधित अधिकाऱ्यांची सीआयडीमार्फत चौकशी करत कारवाई कराव, अशी मागणी प्यारे खान यांनी केली आहे.

# तब्बल १६ हजार बनावट जन्मनोंद दाखल्यांनी खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील अवैध जन्म प्रमाणपत्र वाटपाच्या प्रकरणावरून प्रशासनावर जोरदार निशाणा साधला आहे. हा केवळ प्रशासकीय गोंधळ नसून देशाच्या सुरक्षेचा अत्यंत गंभीर विषय असल्याचे त्यांनी म्हटले आहे. याप्रकरणी महानगरपालिकेचे महापौर समीर राजूरकर यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेचे त्यांनी स्वागत केले असून बोगस प्रमाणपत्रे मिळवून देशात राहणाऱ्या घुसखोरांवर कडक कारवाई करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या जुन्या रेकॉर्डमध्ये तब्बल १६ हजार नवीन नावे वाढवण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महापालिकेत यापूर्वीच ७०० संशयास्पद जन्म प्रमाणपत्रे दिली गेल्याचा आरोप असून, त्यासंदर्भात महिनाभरात सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कारवाईचा निर्णय घेतला जाणार आहे. आतापर्यंत या प्रकरणात २०० लोकांची नावे आरोपी म्हणून समोर आली असून, महापौरांनी या संपूर्ण रेकॉर्डच्या सखोल तपासाचे निर्देश दिले आहेत. अशा प्रकारची बोगस नोंदणी संपूर्ण महाराष्ट्रात जिथे

**छ. संभाजीनगरमधील गंभीर प्रकारानंतर किरीट सोमय्या आक्रमक**

जिथे झाली आहे, त्या सर्वांची तपासणी आता कडकपणे केली जाणार असल्याचे सोमय्या यांनी सांगितले.

संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आकडेवारी अत्यंत धक्कादायक आहे. एका गावाची अधिकृत लोकसंख्या १३०० असताना मे २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या सहा महिन्यांच्या काळात तब्बल ३४४७ नवीन जन्मांची नोंदणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या नोंदींमधील एकही नाव स्थानिक रहिवाशाचे नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

असाच प्रकार यवतमाळमध्येही उघडकीस आला होता, जिथे १४०० लोकसंख्या असलेल्या गावात २७ हजार नोंदणी आढळल्या होत्या. सिल्लोडमध्ये देखील अकराशे अपात्र आणि बेकायदेशीर प्रमाणपत्रे दिली गेली असून, या प्रकरणाला गती देण्यासाठी महापौरांनी आता दर महिन्याला आढावा बैठक घेण्याचे ठरवले आहे.

**मुख्यालय सोडण्यास मनाई; १८ जणांची यादी जाहीर**

**१२ वीच्या परीक्षेत कॉपीला मदत करणे पडले महागात**

# जिल्हाधिकाऱ्यांकडून १८ शिक्षक तडकाफडकी निलंबित!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : इयत्ता बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अतिशय महत्त्वाची परीक्षा मानली जाते. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट म्हणून या परीक्षेकडे पाहिले जाते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने ही परीक्षा पार पडते. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करता या परीक्षेत कॉपी होणार नाही याची काळजी घेतली जाते. तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रावर कठोर शिस्तीचं पालन केलं जातं. काही ठिकाणी पोलिसांची सुरक्षा देखील पाहिली जाते. असं असताना काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या कॉपीचे प्रकार समोर येतात. तसेच काही ठिकाणी विद्यार्थ्यांना कॉपीला मदत केली जात असल्याचादेखील संतापजनक प्रकार समोर येतो. पण अशा प्रकारच्या घटनांवर कठोरात कठोर कारवाई केली जाते. छत्रपती संभाजीनगरमध्ये अशीच एक मोठी कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १२ वीच्या परीक्षेत एक मोठी खळबळ उडाली आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळत परीक्षा केंद्रावर गैरप्रकारांना खतपाणी घालणाऱ्या १८ शिक्षक आणि कर्मचाऱ्यांवर जिल्हा प्रशासनाने निलंबनाची मोठी कुऱ्हाड चालवली आहे. या धडक कारवाईमुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. तसेच कॉपी बहाद्दरांच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या टोळ्यांचे धाबे दणाणले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांचा सर्जिकल स्ट्राईक

दक्षता समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी बोर्ड परीक्षेतील पारदर्शकतेबाबत आधीच कडक इशारा दिला होता. तरीही, कन्नड तालुक्यातील जेवपूर येथील राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर नियमांची पायमल्ली होत असल्याची माहिती समोर आली. या माहितीची दखल घेत शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाठकर यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले. जेव्हा सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले, तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या काही शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे धक्कादायक कारनामे उघड झाले, ज्यानंतर ही कठोर कारवाई करण्यात आली.

या प्रकरणात दोषी आढळलेल्या १७ शिक्षकांसह एका सेवकाला तातडीने निलंबित करण्यात आले आहे. यामध्ये निर्मळ भगवान, सचिन



सातदिवे, नरेश सोनवणे, छाया मुंगे यांच्यासह एकूण १८ जणांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, निलंबन कालावधीत या सर्वांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच त्यांना कोणतीही खाजगी सेवा किंवा नोकरी करण्यासही बंदी घालण्यात आली असून, तसे केल्यास त्यांच्यावर अधिक कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



संपादकीय....

## निष्पापांचा बळी

राजस्थानमधील भिवाडी येथील एका केमिकल कारखान्यात शक्तिशाली स्फोटात आठ कामगार जिवंत जळाले, तर चार जण गंभीर भाजले. त्यांना दिल्लीतील एम्समध्ये रेफर करण्यात आले आहे. कारखान्यात बेकायदेशीर फटाके बनवले जात होते. घटनास्थळावरून गनपावडर, फटाके आणि पॅकिंग कंटेनर जप्त करण्यात आले आहेत. सकाळी साडे नऊ वाजता खुशखेडा करौली औद्योगिक क्षेत्रात हा अपघात झाला. घटनेच्या वेळी सुमारे २५ कामगार काम करत होते. मृतदेह गंभीरपणे जळाले होते, फक्त अनेकांचे सांगाडे शिल्लक होते. शरीराच्या अवयवांचे तुकडे विखुरलेले आढळले. बचाव पथकाने हे तुकडे पॉलिथिन पिशव्यांमध्ये गोळा केले. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तात्काळ पोहोचले. आग विझवण्यासाठी खूप प्रयत्न करण्यात आले, परंतु आगीची तीव्रता पाहता आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तिथे काम करणारे चार ते पाच लोक जखमी झाले आहेत आणि त्यांना दिल्लीतील एम्स येथे रेफर करण्यात आले आहे. बचाव कार्य पूर्ण झाले आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की युनिटकडे रेडीमेड कपड्यांचा परवाना होता आणि आत लहान स्फोटके आणि फटाके सापडले आहेत. हा एक गारमेंट झोन आहे; येथे इतर कोणताही व्यवसाय करण्यास परवानगी नाही. तथापि, बंद गेटच्या मागे बेकायदेशीर फटाके बनवले जात होते.

# खामसवाडी येथील श्री सिद्धिविनायक ग्रीनटेक इंडस्ट्रीज प्रा.ली.चा गळीत हंगामाची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी:हनुमंत पाटुळे/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील श्री सिद्धिविनायक ग्रीनटेक इंडस्ट्रीज प्रा.ली. या साखर कारखान्याचा गळीत हंगाम (२०२५-२६) दि. १९ फेब्रुवारी २०२६ (गुरुवार) रोजी अधिकृतपणे बंद करण्यात येणार असल्याची माहिती कारखाना प्रशासनाने परिपत्रकाद्वारे दिली आहे. कारखान्याकडे हंगामासाठी नोंद केलेला ऊस अद्याप तोडणी अभावी शेतात उभा असल्यास संबंधित ऊस उत्पादक सभासद व बिगर सभासद शेतकऱ्यांनी १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत कारखान्याच्या शेतकी विभागाशी संपर्क साधून ऊस गाळपासाठी पाठवण्याची




व्यवस्था करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

कारखान्याने स्पष्ट केले आहे की, दिलेल्या मुदतीनंतर शिल्लक राहिलेल्या उसाबाबत कारखाना जबाबदार राहणार नाही. तसेच सर्व तोडणी व वाहतूक ठेकेदारांनी १८ फेब्रुवारी रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत ऊसाची वाहने यार्डात दाखल करावीत. त्यानंतर येणारी वाहने यार्डात घेतली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी, असेही सूचित करण्यात आले आहे. दरम्यान,सर्व वाहन ठेकेदार, कर्मचारी व अधिकारी वर्ग यांनी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कारखाना स्थळी उपस्थित राहावे,असे आदेशावरून कळविण्यात आले आहे.

गळीत हंगामाच्या सांगता समारंभाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील शेतकरी व संबंधित घटकांनी वेळेत कार्यवाही करावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# महादेव खराटे यांना शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील आढाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत असलेले उपक्रमशील सहशिक्षक महादेव खराटे यांना संजीवनी फाउंडेशन, सिन्नर (नाशिक) यांच्या वतीने या वर्षीचा शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सिन्नर येथे प्रदान करण्यात आला.



या समारंभास माननीय माजी मंत्री बच्चुभाऊ कडू, शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, प्रसिद्ध तमाशा कलावंत पद्मश्री रघुवीर खेडकर, नाशिक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सानप, महाराष्ट्र राज्याचे मृदा सहसचिव हरिभाऊ गीते, महिला आयोगाच्या सदस्या उत्कर्षाताई रूपवते आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते महादेव खराटे यांना सहकुटुंब पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमशीलता तसेच शिवव्याख्याते म्हणून शाळा, महाविद्यालये व विविध स्तरांवर केलेल्या मार्गदर्शनाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.


पुरस्कार स्वीकृती प्रसंगी महादेव खराटे यांनी हा सन्मान प्रेरणादायी व अभिमानास्पद असल्याचे सांगितले. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अधिक जोमाने कार्यरत राहण्याची प्रेरणा या पुरस्कारामुळे मिळत राहील,असे त्यांनी गौरवोद्गार काढले, त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# महाशिवरात्री निमित्त श्री विठ्ठलाची पूजा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाशिवरात्री निमित्त दिनांक १५ फेब्रुवारी रोजी रात्रौ १२ वाजता श्री विठ्ठलाच्या मस्तकावर शिवलिंग असल्याने त्याची षोडशोपचार पूजा विधीवत करण्यात आली.

सदरची पूजा मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाली. या पूजेसाठी होळकर संस्थानतर्फे काशी येथून पवित्र गंगाजल उपलब्ध करून देण्यात आले होते.



या पवित्र पूजेच्या वेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व कर्मचारी उपस्थित होते.

# महाडच्या ग्रामदैवत विरेश्वर महाराजांच्या छबिना उत्सवाला महाशिवरात्रीपासून दिमाखात सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड : रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठ्या आणि पारंपरिक यात्रांपैकी एक असलेल्या महाडच्या ग्रामदैवत श्री विरेश्वर महाराजांच्या छबिना उत्सवाला रविवारी महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर उत्साहात प्रारंभ झाला आहे. चार ते पाच दिवस चालणाऱ्या या उत्सवादरम्यान मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

विरेश्वर महाराजांची बहीण मानल्या जाणाऱ्या गावदेवी जाकमाता देवीच्या मंदिरातून विधीवत पूजा-अर्चा करून देवीची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी अनेक भाविकांनी गर्दी केली होती.

वाद्यांच्या गजरात निघाली मिरवणूक : पावा-झेंडा घेऊन मानकरी, वेषधारी गोंधळी, मानाचे खांदेकरी, ब्रास बँड, सनई-चौघडा यांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर नाचणाऱ्या भाविकांच्या उपस्थितीत संपूर्ण महाड शहर भक्तिमय झालं आहे. महाड शहरातील विविध भागांमधून निघालेले आखाडे देखील या मिरवणुकीत मोठ्या उत्साहानं सहभागी होतात. यामुळं सोहळ्याची रंगत अधिकच वाढते.मोठ्या संख्येनं भाविक महाडमध्ये दाखल : उंचच उंच सासणकाठ्या खांद्यावर नाचवत सादर केला जाणारा पारंपरिक खेळ हा संपूर्ण कोकणात केवळ महाडचीच खास ओळख मानला जातो. बाजारपेठेतून ग्रामदेवता जाकमातेची पालखी विरेश्वर महाराजांच्या भेटीसाठी निघाल्याचा हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. मुंबई, पुणे, ठाणे तसंच महाड पंचक्रोशीतील हजारो भाविक नवस फेडण्यासाठी आणि या अद्वितीय सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी महाडमध्ये दाखल झाले असून पुढील काही दिवस संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

उत्सवाचा पहिल्या दिवशी बांधी विशेष पूजा : महाडचे ग्रामदैवत श्री विरेश्वर महाराज यांचा छबिना उत्सव नुकताच साजरा झाला. यामध्ये लाखो भाविक महाडमध्ये आले होते. शिवाय विविध जिल्ह्यातून आणि परराज्यातून विविध खेळण्यांची दुकाने देखील आली आहेत. ग्रामदैवत श्री विरेश्वर महाराजांच्या छबिना उत्सवास पारंपरिक पद्धतीनं प्रारंभ झाला. रविवारी उत्सवाच्या प्रथम दिवशी महाराजांची विशेष महापूजा बांधण्यात आली.

# दिल्ली येथे 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आराखड्याची होणार मांडणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिल्ली येथील भारत मंडपम येथे आयोजित करण्यात आलेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट' मध्ये महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सर्वसमावेशक आराखडा मांडला जाणार आहे. राष्ट्रीय महिला आयोग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना आणि संयुक्त राष्ट्र प्रशिक्षण व संशोधन संस्था या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हे सत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील संधी, कौशल्यविकास, डिजिटल उद्योजकता आणि आर्थिक स्वावलंबन या विषयांवर विशेष भर देण्यात येणार आहे. हे सत्र १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता भारत मंडपम, कक्ष क्रमांक नऊ येथे होणार आहे. या समिटमध्ये राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, युनिटारच्या संचालिका (समृद्धी विभाग) मिहोको कुमामोटो, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या (आयटीयू) प्रादेशिक संचालिका (आशिया-पॅसिफिक) अत्सुको ओकुदा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, संगीतकार निर्माता कार्तिक शाह यांच्यासह उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, तंत्रज्ञान तज्ज्ञ आणि महिला उद्योजिका सहभागी होणार असून महिलांच्या नेतृत्वाखालील आर्थिक प्रगतीस चालना देण्यासाठी ठोस उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. विशेषत: ग्रामीण व वंचित घटकांतील महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सक्षम करण्यावर भर राहणार आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन एआय विषयावरील विशेष व्हिडिओ सादरीकरणद्वारे होणार आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर या ''आर्थिक शक्ती: सामायिक समृद्धीसाठी राष्ट्रीय अपरिहार्यता'' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. युनिटारच्या संचालिका मिहोको कुमामोटो ''समावेशक आणि समृद्ध भविष्यासाठी स्थानिक क्षमता विकास'' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या (आयटीयू) प्रादेशिक संचालिका अत्सुको ओकुदा या ''लैंगिक डिजिटल दरी कमी करण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण'' या विषयावर उद्बोधन करणार आहेत. पॅनल चर्चेमध्ये विजया रहाटकर ह्या महानगरांबाहेरील महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्राधान्यक्रम, कौशल्यविकास, वित्तपुरवठा व सुरक्षिततेवरील भूमिका या विषयावर तर अत्सुको ओकुदा ह्या आशिया-पॅसिफिक अनुभवातून डिजिटल दरी कमी करण्याच्या उपाययोजना या विषयावर चर्चा करतील. तसेच ब्रिजेश सिंह हे ''महिला वापरकर्त्यांसाठी सायबर धोके व सुरक्षिततेतील पोकळी'' या विषयावर तर कार्तिक शाह हे ''सर्जनशील क्षेत्रातील एआय संधी व आव्हाने'' या विषयावर भूमिका मांडणार आहेत. परिसंवादानंतर उपस्थितांसोबत प्रश्नोत्तर सत्र होणार आहे.

या चर्चासत्रात महानगरांपलीकडील महिलांना एआयच्या माध्यमातून आर्थिक सक्षमता कशी मिळवून देता येईल, महिला उद्योजिकांसाठी सायबर सुरक्षिततेतील कोणत्या त्रुटी तातडीने दूर करणे आवश्यक आहे, तसेच सर्जनशील अर्थव्यवस्थेत एआयमुळे निर्माण होणाऱ्या संधी आणि आव्हानांचा कसा सामना करावा, या मुद्द्यांवर सखोल चर्चा होणार आहे.

# चोरांनी मंत्र्यांच्या घरांवर दरोडे टाकले पाहिजेत, बच्चू कडू यांची सरकारवर टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमरावती : शहरातील अत्यंत सुरक्षित समजल्या जाणाऱ्या कांतानगर परिसरातील न्यायाधीशांच्या वसाहतीत शनिवारी मध्यरात्रीनंतर धाडसी चोरीची घटना घडली. पाच न्यायाधीश आणि चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांची घरे फोडण्यात आली. या घटनेने शहरात खळबळ उडालेली असताना या पार्श्वभूमीवर प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी सरकारवर टीका केली आहे. बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर शरसंधान केले आहे. चोरांनी न्यायाधीशांच्या घरावर नव्हे, तर मंत्र्यांच्या घरावर दरोडे टाकले पाहिजेत, अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त केला आहे. बच्चू कडू म्हणाले, न्याय देणारे न्यायाधीशच जर अडचणीत असतील, तर देवाभाऊ तुमची वानरसेना काम केव्हा करणार, तुम्ही मुख्यमंत्री आहात, तुमच्याकडे गृहखात्याचा कारभार आहे. इथे दरोडेखोर खुलेआम फिरत आहेत. कुठलेही एखादे चांगले काम दाखवा, एखादे चांगले तहसील कार्यालय दाखवा. पैसे घेतल्याशिवाय काम करणारा एखादा अधिकारी दाखवा. प्रभू श्रीरामाचे तुम्ही नाव घेता, पण रामराज्याला तुम्ही स्पर्शही केला नाही. न्यायाधीशांच्याच घरी चोरी होत असेल, तर सर्वसामान्य लोकांचे काय?. या राज्यात हिंदू तर 'खतरे मे' आहेच, पण आता न्यायाधीशही 'खतरे मे' आले आहेत. 'बटेंगे तो कटेंगे' म्हणणाऱ्या सरकारच्या राज्यात न्यायाधीशच संकटात सापडले आहेत. बच्चू कडू मुख्यमंत्र्यांना उद्देशून म्हणाले, तुमचे नाव देवाभाऊ आहे, पण देवासारखे राज्य येणार कधी?, आमच्या तुमच्याकडून बऱ्याच चांगल्या अपेक्षा आहेत.

# प्रधानमंत्री मोदींकडून महाराष्ट्रासह चार राज्यांना रेल्वे प्रकल्पांची भेट; १८,५०९ कोटींच्या खर्चाला मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना बळकटी देणाऱ्या तीन महत्त्वाच्या बहुमार्गी प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणा आणि कर्नाटक या चार राज्यांतील १२ जिल्ह्यांमध्ये रेल्वेचे जाळे विस्तारणार असून, एकूण ३८९ किलोमीटरची भर पडणार आहे. १८,५०९ कोटी रुपये अंदाजे खर्च असलेले हे प्रकल्प २०३०-३१ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.



यामध्ये महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा कसारा – मनमाड दरम्यानच्या ३ या आणि ४ थ्या रेल्वे मार्गाचा समावेश आहे. यासोबतच दिल्ली – अंबाला आणि बल्लारी – होस्पेट या मार्गावरही ३ रा आणि ४ था मार्ग उभारला जाणार आहे. या वाढीव रेल्वे क्षमतेमुळे वाहतुकीतील कोंडी कमी होऊन रेल्वे सेवेची विश्वासार्हता आणि कार्यक्षमता वाढणार आहे. पीएम गती शक्ती राष्ट्रीय बृहद् आराखड्यानुसार या प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले असून, यामुळे मालवाहतूक आणि प्रवासी दळणवळण अधिक सुलभ होईल.

या प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा ग्रामीण भागाला होणार असून, सुमारे ९७ लाख लोकसंख्या असलेल्या ३,९०२ गावांची संपर्क व्यवस्था सुधारणार आहे. विशेषत: महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, भावली धरण, श्री घाटणदेवी यांसारख्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांकडे जाणारा प्रवास आता अधिक सोयीचा होईल. तसेच कोळसा, पोलाद, लोह खनिज, सिमेंट आणि धान्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी हे मार्ग कळीचे ठरणार आहेत, ज्यामुळे प्रतिवर्ष ९६ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक शक्य होईल.

पर्यावरणाच्या दृष्टीनेही हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. रेल्वे हा वाहतुकीचा पर्यावरणपूरक पर्याय असल्याने, या प्रकल्पामुळे २२ कोटी लिटर इंधन आयातीची बचत होईल आणि १११ कोटी किलोग्रॅम कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन कमी होईल, जे सुमारे ४ कोटी झाडे लावण्याइतके प्रभावी ठरेल. याशिवाय, बांधकामाच्या काळात सुमारे २६५ लाख मनुष्यबळ दिवस इतकी मोठी रोजगार निर्मिती होणार असल्याने स्थानिकांना स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पडघ्यात वाहतुकीचा उडाला बोजवारा

## वाढती गर्दी, बेशिस्त पार्किंग आणि अपुरे नियोजन ठरतंय कारणीभूत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यात झपाट्याने वाढणाऱ्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर पडघा येथील मुख्य बाजारपेठेत वाहतुकीचा बोजवारा उडाल्याचे चित्र शनिवारी सायंकाळी पुन्हा एकदा पाहायला मिळाले. वाढती लोकसंख्या, अव्यवस्थित पार्किंग, अपुरी रस्ते रुंदी आणि वाहतूक नियोजनाचा अभाव यामुळे पडघ्यातील नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. पडघ्यातील मुख्य रस्ते सध्या बेशिस्त वाहनांनी अक्षरशः गिळंकृत केले असून दिवसाला हजारो लहान-मोठी वाहने या बाजारपेठेत ये-जा करतात. मात्र त्या तुलनेत वाहतुकीचे कोणतेही ठोस नियोजन नसल्याने काही वर्षांतच वाहतूक व्यवस्थेची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळेत बाजारपेठेत प्रचंड गर्दी होत असल्याने वाहनचालकांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, पडघा गावाचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढत असताना मुख्य बाजारपेठेचे रुंदीकरण झालेले नाही. परिणामी, अरुंद रस्त्यांवर अवजड वाहने शिरताच इतर वाहनांना मार्ग मिळत नाही आणि तात्काळ वाहतूक कोंडी निर्माण होते.

यामुळे पादचारी, व्यापारी आणि वाहनचालक यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. मच्छी मार्केट, बसस्थानक आणि मुख्य बाजारपेठ परिसर हा सध्या पार्किंग समस्येचा धोकादायक झोन बनला आहे. पार्किंगसाठी स्वतंत्र जागा नसल्यामुळे वाहनचालक रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बेशिस्तपणे वाहने उभी करतात. त्यामुळे रस्ता आणखी अरुंद होऊन वाहतूक ठप्प होते. अनेकदा पादचाऱ्यांना वाहनांच्या मधून पायवाट काढणेही कठीण बनते. दिवसभर रस्त्यांवर उभ्या असलेल्या वाहनांमुळे आणि अनियंत्रित वाहतुकीमुळे सायंकाळी कोंडी ही नित्याचीच समस्या झाली आहे.

विशेष म्हणजे, वाहतूक कोंडी होत असतानाही संबंधित ठिकाणी वाहतूक पोलिसांची अनुपस्थिती नागरिकांच्या नाराजीचे कारण ठरत आहे. या पार्श्वभूमीवर पडघा पोलिस तसेच पडघा ग्रामपंचायतीने तातडीने वाहतूक नियंत्रण, पार्किंग व्यवस्था आणि रस्ते नियोजनाबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. पडघ्यातील वाढत्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा निघणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सहकार शिरोमणी सहयोगी ओंकार शुगर कार्पोरेशनच्या २६ व्या गळीत हंगामाची सांगता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
भाळवणी/प्रतिनिधी

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सह. साखर कारखाना सहयोगी ओंकार शुगर कार्पोरेशन प्रा.लि. युनिट नं.१४ भाळवणी या कारखान्याच्या सन २०२५-२६ च्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ ओंकार शुगर ग्रुपचे चेअरमन बाबुरावजी बोत्रे-पाटील व कल्याणराव काळे यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. सुरवातीस कारखान्याचे संचालक अरुण नलवडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंगलताई नलवडे या उभयतांच्या शुभहस्ते श्रीसत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. यावेळी श्री. व सौ. नलवडे या उभयतांचा सत्कार व्हा. चेअरमन भारत कोळेकर यांचे शुभहस्ते करण्यात आला.

सदर प्रसंगी कारखान्याचे जनरल मॅनेजर रविंद्र साळुंखे यांनी चालु गळीत हंगामात एकूण २,४१,५०० मे.टन ऊसाचे गाळप करुन, २,३५,५०० क्विंटल साखरपोत्यांचे उत्पादन केलेले आहे. सरासरी साखर उतारा ११.२७ टक्के मिळाला आहे. सहवीज निर्मिती प्रकल्पामधुन १ कोटी ८७ लाख युनिट विज निर्मिती झाली असून, त्यामधुन १ कोटी ७ लाख युनिट एक्सपोर्ट करण्यात आली आहे. डिस्टीलरी प्रकल्पही पुर्ण क्षमतेने चालु असून, आज अखेर ११ लाख लिटर उत्पादन झाले आहे. उत्पादित मोलसेसचा विचार करता यापुढेही डिस्टलरी प्रकल्प चालु ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले. चालु गळीत हंगामात गाळपास आलेल्या ऊसाचे ३१/१२/२०२५ पर्यंत ऊसाचे बिल संबंधित शेतकऱ्यांच्या खातेवर रुपये ३०५० प्रमाणे जमा केले असून, उर्वरीत ऊसाचे बिलेही लवकरच जमा करण्यात येणार आहेत. चालु गळीत हंगाम सुरु करण्यास विलंब झाला मात्र पुढील गळीत हंगाम वेळेत चालु करुन उच्चांकी ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्याकरीता सर्व ऊस उत्पादक शेतकरी सभासदांनी आपला संपुर्ण ऊस या कारखान्यास देवुन सहकार्य करण्याचे आवाहन केले व उपस्थितांचे आभार मानले.

या प्रसंगी कारखान्याचे व्हा. चेअरमन भारत कोळेकर, सर्व संचालक, ऊस उत्पादक सभासद शेतकरी, तोडणी वाहतुक ठेकेदार, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

# घोटी केंद्रावरील एस.एस.सी. परीक्षेची आसन व्यवस्था जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय घोटी या केंद्राची एस.एस.सी.परीक्षेसाठीची केंद्र आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे.

जनता विद्यालय घोटी . केंद्र क्रमांक १२१५ असून दि. २० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणाऱ्या परीक्षेसाठी एकूण ३८५ विद्यार्थी प्रविष्ट होणार आहे. जनता विद्यालयात बैठक क्रमांक - डी शून्य ३९२९२ ते डी शून्य ३९६७६ पर्यंत अशी एकूण ३८५ विद्यार्थ्यांची आसनव्यवस्था सर्व विषयासाठी करण्यात आली आहे.या केंद्रात जनता विद्यालय घोटी , मुंढेगाव तसेच नित्यानंद इंग्लिश मेडिअम स्कुल घोटी या शाळा समाविष्ट आहे.

अशी माहिती जनता विद्यालय व उच्च माध्यमिक घोटीचे पर्यवेक्षक व केंद्रसंचालक हिरामण चौधरी यांनी दिली आहे .

परीक्षा सुरू होण्यापूर्वी सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रात हजर रहावे. सोबत फक्त लेखन साहित्य व पाणी बॉटल आणावे. परीक्षा केंद्रात कोणीही मोबाईल तसेच स्मार्ट वॉच आणू नये. दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आव्हान जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज घोटीचे प्राचार्य नितीन भामरे, उपमुख्याध्यापक उल्हास पवार, केंद्र संचालक हिरामण चौधरी, उपकेंद्रसंचालक नामदेव सरगर, मुख्य लिपिक भाऊसाहेब रणशेवरे, वरिष्ठ लिपिक जीवन शिंदे, अनिल गोवर्धने, वैशाली विधाते, संपत शेंगाळ यांनी केले आहे.

# कर्मवीर इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक अनिल बाबर यांना पीएचडी पदवी प्रधान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचालित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक अनिल बाबर यांना विश्वरया तंत्रशास्त्र विद्यापीठ, बेळगाव यांच्यातर्फे नुकतीच पेजडी पदवी प्रधान करण्यात आली.

वर्मी कंपोस्टिंग ऑफ शुगर केन फ्रेश अँड एप्लीकेशन इन डिग्रेडेशन ऑफ इंजीनियरिंग इन चॉईस या मध्ये त्यांनी संशोधन पूर्ण केले ऊस कापणी नंतर शेतात मोठ्या प्रमाणात निर्माण होणारे सेंद्रिय कचऱ्यापासून त्याचे गांडूळ खतात रूपांतर करणे हा त्यांच्या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे यासाठी त्यांना प्राध्यापक डॉक्टर एन एस पाटील डॉक्टर संजीव संगमी यांचे मार्गदर्शन लाभले.

हे यशाबद्दल श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी डॉक्टर अनिल बाबर यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांच्या हस्ते डॉक्टर अनिल बाबर यांच्या येतोच सत्कार करण्यात आला यावेळी पॉलिटेक्निकल चे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे रजिस्टर जी डी वाळके उपप्राचार्य जे एस मुळेगावकर डॉक्टर अमोल आणि मोठे संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक राहुल पांचाळ विभाग प्रमुख डॉक्टर एस एम लंबे डॉक्टर एस व्ही एकलारकर प्राध्यापक दीपक भोसले तसेच सर्व प्राध्यापक यांनी डॉक्टर अनिल बाबर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच सर्व सरातून डॉक्टर अनिल बाबर यांचा अभिनंदन केली जात आहे.

# मोहा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला ग्रामपंचायतीकडून झेरॉक्स मशीन भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रविण म.कसबे : कळंब तालुक्यातील मोहा ग्रामपंचायतीकडून केंद्रीय प्राथमिक जिल्हा परिषद शाळा, व उर्दू शाळा आणि जिल्हा परिषद कन्या शाळा मोहा यांना ग्रामपंचायतीच्या वतीने तिन्ही शाळांना प्रत्येकी एक बँन्डेड कंपनीचे झेरॉक्स मशीन्स उपलब्ध करून देण्यात आल्या.

शाळेची व शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालकांची आग्रही मागणी लक्षात घेता विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेसाठी सराव परीक्षा घ्याव्या लागत असल्याने आणि त्यासाठी वारांवार लागत असणारा मोठा खर्च व विद्यार्थ्यांच्या अशा एक ना अनेक शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन ग्रामपंचायतीच्या सरपंच सिमा संदीप मडके, उपसरपंच बशारत मोमिन तसेच ग्रामपंचायत सदस्य व कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक संदीप मडके यांनी या बँन्डेड कंपनीच्या

**मोहा ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम**

झेरॉक्स मशिन्स उपलब्ध करून दिल्याने विद्यार्थ्यांना सराव प्रश्नपत्रिका, अभ्यास साहित्य सहज आणि कमी खर्चात उपलब्ध होऊन गुणवत्ता वाढण्यास मदत होणार असल्याने विद्यार्थी व पालकवर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

## सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाची नगराध्यक्षाकडे निवेदनाद्वारे मागणी

# शिव-तीर्थावरील नव्याने उभारण्यात आलेल्या टाऊन हॉलला छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन नाव द्यावे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

मंगळवार शहरातील शिवप्रेमी चौकातील शिवतीर्थ परिसरातील नगर परिषदेच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या टाऊन हॉलला छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवनअसे नाव देण्यात यावे, अशी मागणी सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या वतीने नगराध्यक्ष सुनंदाताई अवताडे यांच्याकडे निवेदन देऊन करण्यात आले आहे. मंगळवेढा शहरातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या असून अनेक संतांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली आहे.

इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी नोंद असलेली बाब म्हणजे २० डिसेंबर १६६५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज दोन दिवस मंगळवेढा येथे मुक्कामी होते. त्यामुळे शहराला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. सद्यस्थितीत शिवप्रेमी चौकात भव्य अशा छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यांची उभारणी करण्यात आली असून त्या मुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे हा परिसर शिवतीर्थ म्हणून ओळखला जात असून शिवभक्तांसाठी तो श्रद्धेचे स्थान बनला आहे. अशा पवित्र आणि ऐतिहासिक ठिकाणी नगर परिषदेच्या माध्यमातून टाऊन हॉलची उभारणी करण्यात आली आहे या पार्श्वभूमीवर या टाऊन हॉलला छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन असे नाव देणे ही काळाची गरज असून त्याद्वारे शिवरायांच्या विचारांचा हा इतिहासाचा सन्मान होईल, तसेच भावी पिढ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि प्रेरणा निर्माण होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे केवळ सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाचीच नव्हे तर समस्त मंगळवेढाकरांची भावना असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे नगराध्यक्ष सुनंदाताई अवताडे यांच्याकडे निवेदन सादर करताना नगरसेवका सीमाताई गुरुजी सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष पदाधिकारी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मागणीवर नगरपरिषद प्रशासन काय निर्णय घेते याकडे आता शेरवाशांची लक्ष लागले आहे.

# एलएलबी (लॉ) प्रवेशासाठी आवश्यक 'सीईटी २०२६' परीक्षेचे ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी पुन्हा मुदतवाढ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये एलएलबी (लॉ) ला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'सीईटी २०२६' या परीक्षेकरिता ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या प्रक्रियेस दुसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रक आता याप्रमाणे आहे- तीन वर्ष कालावधीसाठी ही प्रक्रिया शनिवार, दि.२८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत तर पाच वर्ष कालावधीसाठी रविवार, दि. १५ मार्च २०२६ पर्यंत सुरु राहणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

एलएलबी (लॉ) प्रवेशासाठी अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणार्या 'एमएएच-सीईटी २०२६' या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची मुदत तीन वर्ष कालावधीसाठी गुरुवार, दि.०८ जानेवारी २०२६ पासून ते शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ पर्यंत तर पाच वर्ष कालावधीसाठी शुक्रवार, दि.०९ जानेवारी २०२६ पासून ते शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ पर्यंत अशी मुदत दिली होती. परंतु या कालावधीत आवश्यक कागदपत्रे अशा काही कारणाने विद्यार्थ्यांना प्रक्रिया पूर्ण करता आली नाही. हे ओळखून या प्रक्रियेला मुदतवाढ दिली होती. आता पुन्हा याच कारणास्तव दुसऱ्यांदा मुदतवाढ दिली असून आता तीन वर्ष कालावधी साठी शनिवार, दि.२४ जानेवारी २०२६ पासून ते शनिवार, दि.२८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत तर पाच वर्ष कालावधी साठी रविवार, दि.२५ जानेवारी २०२६ पासून ते रविवार, दि. १५ मार्च २०२६ पर्यंत ही प्रक्रिया सुरु राहणार आहे. सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरी लॉ कॉलेजमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी सदर फॉर्म भरण्यासाठी येताना आपल्या प्रवर्गानुसार आवश्यक असणारी फॉर्म फी आणि आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावी. हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. सीईटी फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आधार कार्ड, आयडेंटी आकाराचा रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड, ओटीपी करीता मोबाईल या महत्वाच्या बाबी आवश्यक असणार आहेत. याबाबत शासनाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. उत्तम अनुसे (मोबा.-९१६८६५५३६५) तर एल.एल.बी. संदर्भात ॲड. विक्रम पाटील (मोबा. नंबर-९०९६०१६६२५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# निरगुडी ता. आळंद येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सव उत्साहात साजरा

## देशभरातील लाखो भाविक भक्तांची उपस्थिती; भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :

बोलो भारतमाता की जय! वंदे मातरम्! हर हर महादेव! राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज की जय या जयघोष करीत देशभरातील लाखो भाविक भक्तांनी महाशिवरात्री यात्रा महोत्सव व रथोत्सव कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरी केली.

जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात महाराष्ट्र कर्नाटक सीमाभागातील निरगुडी ता. आळंद येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सव निमित्त विविध धार्मिक, सामाजिक आणि देशभक्ती कार्यक्रम उत्साहात साजरी करण्यात आला. देश वाचला तर आम्ही सारे जण वाचणार असून देशच माझा घर, देशच माझा परिवार असे समजून प्रत्येक शिवभक्तानी आपले जिवन सार्थक करून घेण्यासाठी देशभक्ती मार्गाकडे वळावे म्हणून श्री ॐ हवा मल्लीनाथ महाराजांनी संपूर्ण देशभरात सहा हजारोहून अधिक शिवलिंगाची स्थापना करून चिरंतर प्रसाद सर्वासमोर ठेवले आहे. शिवभक्तीतून देशभक्त निर्माण होण्यासाठी जय भारतमाता सेवा समितिचे हजारो शाखा स्थापना



करून देशभरात देशभक्तीचा बुलंद आवाज तयार केले आहे.

या पैकी रेवणसिद्धश्वरलिंग देवस्थान हे मुळ व सर्वोच्च स्थान असल्याने या महाशिवरात्री यात्रा महोत्सवास महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, गुजरात आदी राज्यासह देशभरातील लाखो भाविक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.आळंद, अक्कलकोट आणि उमारगा तालुक्यातील तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील भाविक भक्तांकडून यात्रेचे जोरदार जय्यत तयारी करण्यात आले होते.बुधवार दि. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी शिव स्तुती आणि देश भक्तिचा जयजयकार करीत रात्रभर विविध वाद्यसह फट्याक्याची आतषबाजी करीत निरगुडी गावातून देवस्थान पर्यत 'श्रीची' भव्य पालखी व कुंभ मिरवणूक काढण्यात आली. सोमवार दि.१६ रोजी पहाटे श्री चे महाभिषेक, सकाळी अग्नी पूजा आदी कार्यक्रम झाली असून दुपारी ५ वाजता राष्ट्रीय संत सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात दहीहंडी फोडत, खारीक बदामाचे मुक्त उधळण करीत , फट्याक्याची आतषबाजी करीत रथोत्सव कार्यक्रम जल्लोषात साजरी करण्यात आला. यानंतर जंगी कुस्ती स्पर्धा झाली. आमवशा निमित्त विविध धार्मिक व देशभक्ती कार्यक्रम उत्साहात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील लाखो भाविक भक्तांना वरील दोन दिवसांच्या कालावधीत रात्रंदिवस देवस्थान कमिटीकडून मोफत महाप्रसादची व्यवस्था करण्यात आली होती. भाविक भक्तानी सद्गुरुचा दर्शन आणि महाप्रसदाचा लाभ घेऊन जल्लोष साजरा केला.

# माता प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंती निमित्ताने १३ फुटी शिवमूर्तीची दिमाखदार मिरवणूक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर शहरातील माता प्रतिष्ठान तर्फे शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १३ फुटी भव्य मूर्तीची दिमाखदार मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक लेझीमच्या तालावर परिसर दणाणून गेला.

मिरवणुकीचा शुभारंभ सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक गणेश वानकर, नगरसेवक ऋण्मयी गवळी, नगरसेवक सोनाली गायकवाड यांच्या हस्ते शिवरायांची आरती करून करण्यात आली,यावेळी संस्थापक महेश मुदलियार, उत्सवा अध्यक्ष सोमनाथ मस्के यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी संभाजी आरमारचे श्रीकांत डांगे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, मुन्ना वानकर, दत्तात्रय वानकर, लहू गायकवाड, चंद्रकांत पवार, महादेव गवळी,श्याम गांगर्डे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनानंतर उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका ऋण्मयी गवळी व सोनाली गायकवाड यांनी लेझीमचा ठेका धरला.

मिरवणुकीची सुरुवात दमानीनगर येथील पावन गणपती मंदिर पासून होऊन मरी आई चौक मार्गे थोबडे वस्ती येथे समारोप झाला.

या मिरवणुकीत शेकडो महिलांचा पारंपरिक वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग लाभला. धनगरी ढोल, मल्लखांब, दांडपट्टा यांसह पारंपरिक कलांचे सादरीकरण झाले.

पद्मिनी शेट्टियार, कविता मस्के, रेखा मस्के, शोभा मस्के, लक्ष्मी नागने, पद्मिनी गायकवाड,राणी जाधव, रेश्मा नरळे, दमयंती भुसे यांच्या सह शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या.

ही मिरवणूक यशस्वीरित्या पार पडण्यासाठी अरुण अवताडे, भाऊ म्हस्के, संजय डोके, सुनील पुकाळे,संजय मस्के , आबा जाधव, तानाजी जाधव, गणेश भुसे, विकास पवार, उमेश मुदलियार, प्रमोद अवताडे गोविंदा नागणे, दत्तात्रय गुंड, निलेश नलवडे, शंभूराजे गायकवाड, नागेश मस्के रितेश मस्के, सूर्या शटयार,,सचिन पुकाळे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी मोठ्या संख्येने शिवप्रेमी आणि महिला पारंपारिक वेशभूषेत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यमाई तलावाचे नाव बदलून लोकनेते अजित दादा पवार स्मृती तलाव असे नामकरण करण्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे नुकतेच विमाना अपघातात दुःखद निधन झाले असून त्यामुळे खऱ्या अर्थाने पश्चिम महाराष्ट्राची खूप मोठी नुकसान झाल्या असून कधी न भरून येणारी पोकळी निर्माण झाली असून अजित दादांनी आपल्या उपमुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात तीर्थक्षेत्र पंढरपूरसाठी भरभरून निधी दिला आहे. त्यातील एक महत्त्वाची आठवण म्हणजे आपल्या पंढरपूर शहरातील यमाई तलाव सुशोभीकरण करण्याचा निर्णय माजी आमदार प्रशांत परिचारक व नगरसेवक यांनी यमाई तलावा मधील गाळ काढून हा तलाव एक पर्यटन स्थळ व्हावे म्हणून आग्रही भूमिका घेतली आणि त्यातील गाळ काढण्यासाठी लोक वर्गणी गोळा करून हा गाळ काढण्याची ठरवले आणि ते करत असताना सर्व नगरसेवक व पदाधिकारी सर्व भागातून मांगू उशीचे जो देगा खुशी से ही घोषणा देत लोक वर्गणी गोळा करत असतानाच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार पंढरपूर दौऱ्यावर आल्यानंतर ही वस्तुस्थिती समोर पाहून दादाने तात्काळ बारामती येथील संबंधित अधिकारी यांना सूचना देऊन गाळ काढण्यासाठी लागणारी सर्व मशहरी पाठवून द्या आणि प्रशांतराव परिचारक यांना सूचना केली की तुम्ही नगरपालिकेचे वतीने फक्त डिझेल द्या बाकी मग होना या शब्दात दादांनी सर्व यंत्रणा दिली आणि तो गाळ करण्याबाबत शिवा विषयी मार्गी लागला. भव्य दिव्य असा यमाई तलाव हा आज पंढरपुरात येणारी वारकरी पर्यटक यांच्यासाठी पर्यटक व आपल्या पंढरपूर शहरातील नागरिकांसाठी ट्रॅक उपलब्ध झाला आहे ही खूप मोठी आठवण अजित दादांनी पंढरपूरकरांसाठी हसून दादाजी नाते ही कायम जोडलेली राहावे म्हणून पंढरपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, राष्ट्रवादी महिला काँग्रेस यांच्या वतीने आम्ही विनम्र पूर्वक मागणी करतो की, यमाई तलाव याला लोकनेते अजितदादा पवार स्मृती तलाव असे नामकरण करण्यात यावी असा ठराव पंढरपूर नगर परिषदेने पास करून दादाच्या स्मृतीस आदरांजली ठराविक असे नामकरण करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून राष्ट्रवादी युवकाचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी निवेदनाद्वारे पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना केलेले आहे. या निवेदनाची प्रत नगराध्यक्ष, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर या गटनेतील, पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर यांना देण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे शहराध्यक्ष मोहम्मद वस्ताद, महिला जिल्हाध्यक्ष वर्षाताई शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर सुडके, युवक शहराध्यक्ष अमोल पर्वतराव, माझी शहराध्यक्ष सुधीर भोसले, जिल्हा सरचिटणीस सारंग महामुनी, सुरज पेंडल, जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप तांदळे शहर कार्याध्यक्ष प्रदीप निर्मळे शहर उपाध्यक्ष संजय मामाने धीरज टिकोरे शिवसेनेचे साईनाथ बडवे आधी मान्यवर उपस्थित होते.

# भाळवणी हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीचा शुभचिंतन सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाळवणी/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन संभाजी शिंदे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सेल्स टॅक्स अधिकारी सारिका साठे या होत्या .



या कार्यक्रमाच्या वेळी स्थानिक स्कूल कमिटीचे संचालक वामनभाऊ सराटे पांडुरंगचे संचालक भगवानराव चौगुले उपसरपंच नितीन शिंदे,ग्राहक पंचायतचे प्रशांत माळवदे, प्राचार्य के डी शिंदे, उपप्राचार्या मोरे पर्यवेक्षक बेसिकराव,आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संभाजी शिंदे म्हणाले की, या शाळेची उत्कृष्ट निकालाची परंपरा आहे आणि ही परंपरा यावेळी जपली जाईल . विद्यार्थ्यांना यापुढे स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. कोणत्याही परीक्षेला सामोरे जाण्याचे धैर्य विद्यार्थ्यांनी जपले पाहिजे आणि आयुष्यात यशस्वी झाले पाहिजे. असेही शिंदे म्हणाले.

यावेळी सारिका साठे म्हणाले की विद्यार्थ्यांनी इंजिनिअरिंग व डॉक्टर या क्षेत्राकडे न होता कॉमर्स क्षेत्र निवडून चार्टट अकाउंट सारखे क्षेत्र निवडून त्यात करिअर केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी बारावीनंतर स्पर्धा परीक्षेची तयारी केली पाहिजे. आपल्या जीवनात यशस्वी व्हायचा असेल तर अभ्यास करण्यात सातत्यपणा ठेवला पाहिजे. तरच आपण आपल्या जीवनात यशस्वी होऊ.

यावेळी विद्यार्थी व शिक्षक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी बोरवेलची मोटर व साहित्य शाळेस भेट दिले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए.आर.चव्हाण यांनी केले तर आभार आर.बी.झांबरे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

# अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसच्या वतीने पुणे महानगरपालिकेसमोर अर्ध नग्न व मुंडन करून आंदोलन करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे मनपा मध्ये रोजंदारी व ठेकेदारीमध्ये काम करणाऱ्या व कामगारांना कामावरून कमी करण्यात आले त्यांना कायम करण्यासाठी न्याय मिळावा म्हणून आपल्याकडे वारंवार पत्रव्यवहार केले असताना कामगारांना कायम करण्यासाठी हायकोर्टाचे २०११ व सन २०२४ चे निर्णय असून देखील व संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना कायम करण्यासाठी महापालिकेने तोंडी आश्वासने व निर्णय देऊन सुद्धा कर्मचाऱ्यांना न्याय प्रदान करण्यात आलेले नाही त्यामुळे संघटनेकडून पुणे महानगरपालिकेतील मुजोर अधिकाऱ्यांच्या विरोधात बुधवार दिनांक २५/ २/ २०२६ रोजी अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसच्या वतीने पुणे महानगरपालिके समोर अर्ध नग्न व मुंडन करून आंदोलन करणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सतीश लालबिगे, प्रभारी अध्यक्ष धर्मेंद्र सडेकर,ड, राशिद सिद्दिकी, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माने, सचिव सूर्यकांत यादव, गणेश लालबिगे, विकास कुचेकर, बाबा गोणेवार, अंकुश म्हेत्रे, अजित मापारे, तेजस्विनी सडेकर यांनी एका पत्रकार द्वारे दिली.

# राज्य शासनाचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार - २०२५ साठी प्रवेशिका मागविण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, लेखन, दूरचित्रवाणी वृत्तकथा, छायाचित्रण, समाज माध्यम तसेच स्वच्छता अभियानाबाबत जनजागृतीपर लेखनासाठी 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार - २०२५' पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे.

**सोलापूर जिल्ह्यातील इच्छुक प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांनी १५ मार्चपर्यंत अर्ज सादर करावेत**

या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन, छायाचित्रे व वृत्तकथा यांची प्रवेशिका मागविण्यात येत आहे. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च २०२६ असा आहे.

सोलापूर जिल्ह्यांतील इच्छुकांनी जिल्हा माहिती कार्यालयाकडून अर्ज प्राप्त करून घ्यावेत. तसेच स्पर्धेच्या नियमावली विषयी सविस्तर माहिती घ्यावी. अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांनी राज्य शासनाच्या या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर यांच्यावतीने करण्यात येत आहे.

**शिवजंयतीनिमित्त शिव सप्ताहाचे आयोजन**

**प्रा.बी.एम.बंदीछोडे यांचे प्रतिपादन**

# खते, बि-बियाणांची निवड करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी सर्वप्रथम माती परीक्षण करणे गरजेचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : शेतकऱ्यांनी सोयाबीन,ऊस किंवा अन्य पिकांची लागवड करण्यापूर्वी आपल्या शेतजमिनीतील माती परीक्षण करूनच खतांची मात्रा आणि बी बियाणे निश्चित करूनचं पिकांची लागवड करावी त्यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळेल असे प्रतिपादन सोयाबीन व ऊस तज्ञ प्रा.बी. एम.बंदिछोडे यांनी वागदरी तालुका तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

शिव- बसव-राणा व काशीबा महाराज जन्मोत्सव मंडळ वागदरी तालुका तुळजापूरच्या वतीने शिवजयंती निमित्ताने दिनांक १३ ते १९ फेब्रुवारी २२६ दरम्यान शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताहातील व्याख्यानाचे पहिले पुष्प गुंफताना प्रा.बी.एम. बंदीछोडे हे बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की शेतकरी अधिक आर्थिक उत्पन्न मिळविण्यासाठी ऊस किंवा सोयाबीन पिक लागवडीची निवड मोठ्या प्रमाणात करत असताना दिसतात तरी आपल्या शेतात ऊस लागवड करण्यापूर्वी बियाणे म्हणून ऊसाच्या कांडीपेक्षा आधुनिक पद्धतीने सध्या नर्सरीमध्ये ऊसाचे रोप उपलब्ध आहे तरी शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनीतील मातीचे परीक्षण करून ऊस पिकाचे रोप नर्सरीतून आणून त्याची योग्य पद्धतीने दोन सरी मध्ये ठराविक अंतर ठेवून लागवड करावी व त्या उसाला लागणारे खत कोणते आणि किती प्रमाणात वापरावे याची माहिती माती परीक्षणाच्या आधारे घेऊनच खताची मात्रा निश्चित करावी अंतर्गत मशागत करून वेळच्यावेळी पाणी दिल्यास एकरी ऊसाच्या उत्पन्नात निश्चितपणे वाढ होईल तेंव्हा शेतकऱ्यांनी याची काळजी घेऊन उसाची लागवड करावी. सोयाबीन पीक पेरणी करत असताना देखील पाण्याचे क्षेत्र कोरडवाहू क्षेत्र माती परीक्षण याचा अभ्यास करून वेळच्यावेळी फवारण्या करून सोयाबीन पिकाची काळजी घेतल्यास शेतकऱ्याच्या उत्पन्नात निश्चितपणे वाढ होईलअसे सांगीतले.

. प्रारंभी छत्रपती शिवाजी, महाराज,महात्मा बसवेश्वर,महाराणा प्रताप व श्री संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून व्याख्यानाला सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी विचारपिठावर प्रा.सचिन मिटकर व युवा शेतकरी गोपाळ उर्फ बाळू यादव हे उपस्थित होते. याप्रसंगी समोर बसलेल्या उपस्थित शेतकऱ्यांना प्रश्न विचारून त्यांच्या शंका कुशंका याचे निरसन करत प्रा.बी.एम. बंदीछोडे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. यावेळी सदन शेतकरी ह भ प राजकुमार पाटील,फत्तेसिंग ठाकूर,रामचंद्र यादव,शशिकांत बिराजदार,भरतसिंह ठाकुर अमोल गोगावे,ग्रा.प.सदस्य अमोल पवार सह शेतकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

